दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● सोमवार २० मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २७६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# मुख्यमंत्रिपद, मंत्रिपद, खासदारकी याची मला.. छगन भुजबळ यांचं राजकीय कारकिर्दीवर भाष्य

## राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी त्यांच्या राजकीय कारकीर्दीवर भाष्य केलं आहे.

राष्ट्रवादीचे अजित पवार नेते छगन भुजबळ यांचं राजकीय कारकिर्दीवर भाष्य केलं आहे. भविष्यात मुख्यमंत्रिपद, मंत्रिपद, खासदारकी याची मला अजिबात अपेक्षा नाही. पक्ष देईल ती भूमिका मी मान्य करेल. ओबीसी आंदोलन वेळी मी मंत्रिपदाचा राजीनामा देवून सहभागी झालो. नाशिक खासदारकी उमेदवारी बाबत माझा विचार झाला.पण मी बघितलं काही अडचणी येतात. त्यामुळे मी त्या प्रक्रियेतून बाहेर पडलो. मी त्यासाठी काही उपोषण, आंदोलन करणार नाही, असं छगन भुजबळ म्हणाले. ते नाशिकमध्ये माध्यमांशी बोलत होते.

कांदाप्रश्नावर काय म्हणाले?छगन भुजबळ कांदा प्रश्नावर भाष्य केलं आहे. कांदा पिकविणारे शेतकरी हे गरीब आहेत. अचानक निर्यातबंदी होते तेव्हा कांदा फेकून द्यावा लागतो. त्याला काही भरपाई मिळत नाही. मागच्या काही वर्षात मी मागणी केली त्यावेळी कांदा अनुदान मिळाले होते. शेतकरी, व्यापारी व काही तज्ञ बसवा आणि निर्यातबंदी वर कायमस्वरूपी मार्ग काढा. कांदा निर्यातबंदी कायमची उठवा. साखर, द्राक्षे निर्यातबंदी आता हळूहळू उठवत आहे. या गोष्टी व्हायला नको, यावर मी पंतप्रधान मोदी यांना बोललो. अबकी बार मोदी सरकार, मुझे बिलकुल शक नाही, असं छगन भुजबळ म्हणाले. निवडणुकीवर काय म्हणाले? उद्या ते 48 जागा जिंकू असे म्हणतील त्यावर विश्वास ठेवणार का? लोकांना ओढण्यासाठी या गोष्टी बोलायच्या असतात. ग्राउंड रियालिटी



तशी नाही. महायुतीच्या जागा मोठ्या प्रमाणात निवडून येणार आहे. नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणार आहेत, असा विश्वास छगन भुजबळ यांनी व्यक्त केला.

मागच्या ईदच्या वेळी वाटणार होतो. पण आचारसंहिता सुरू झाली. त्यासाठी निधी मंजूर झाला. पण वाटता आला नाही. आनंदचा शिधा दलीत, मुस्लिम, हिंदू या सर्वांना मिळतो. आचारसंहिता उठली की मंत्री मंडळात निर्णय घेवून मार्गी लावतो. सण कुठलाही असो सर्वांनाच आनंदाचा शिधा दिला जातो. गणपतीच्या वेळी पण सर्वांना दिला जातो, असंही छगन भुजबळ म्हणालेत.

# सौंदाना गावात कापूस जळून तीन ते साडेतीन लाख रुपयांचे नुकसान

**वादळवार्ता/बीड**

रोजी सध्या बीड तालुक्यात सौंदाना गावात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झालेली आहे एवढी दुष्काळी परिस्थिती असताना शासनाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांच्या मालाला भाव नसल्यामुळे बीड तालुक्यातील प्रत्येक गावात भाव नसल्यामुळे कापूस घरात पडून आहेत तसेच सौंदाना ताजी बीड येथे सौ मिनाबाई अशोक गायके यांच्या घरी भागवत हा धार्मिक कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चालू होता यातच सकाळी दहाच्या सुमारास घरामध्ये 25 ते 30 क्विंटल कापूस असताना अचानक शॉर्ट सर्टिफिकेट मुळे कापसाला आग लागली यातच तीन ते साडेतीन लाख रुपयांचे नुकसान झाले यावेळी गावातील तरुण मुलांनी धाव घेतली आणि कापूस विजवण्याचा प्रयत्न केला पण अगोदरच सर्व कापूस जळून खाक झाला होता यामुळे सौ मीनाबाई अशोक गायके या शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे तरी या कुटुंबाला शासनाने मदत करावी अशी मागणी गावातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके व युवा कार्यकर्ते श्री प्रवीण कथले व अशोक मामा घोलप यांनी केली आहे. तरी याचा पंचनामा



कुमसी सज्जाचे व सौंदाना गावाचे तलाठी सौ स्वाती घुगे मॅडम यांनी पंचनामा केला यावेळी गावातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके तसेच प्रवीण कथले युवा कार्यकर्ते तसेच भाजपाचे तालुका अध्यक्ष अशोक मामा घोलप गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांनी वेळीच दखल घेऊन पंचनामा करताना हजर होते

# नायगाव येथे ३१ रक्तदात्यांचे रक्तदान



**वादळवार्ता/केज**

तालुक्यातील मौजे नायगांव येथे परिवर्तनवादी युगपुरुष जगतज्योती महात्मा बसवेश्वर,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज आणि महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी राहुल खोडसे यांच्या पुढाकारातून महामावांच्या संयुक्त जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान करून आपण एखाद्याचा जीव वाचवू शकतो त्यामुळे रक्तदान करावे असे आवाहन स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचे कर्मचारी यांनी केले आहे.

यावेळी राहुल खोडसे,प्रविण खोडसे,सुधाकर खोडसे,सुरेश खोडसे, ऋषी देशमुख, ऋषि खोडसे, रोहन खोडसे, शार्दूल कुलकर्णी,भालगाव येथील अरविंद मोरे,अनेगावचे सरपंच अशोक गवळी जयदीप इंगळे राज खोडसे,प्रकाश खोडसे यांनीही सहभाग नोंदवला होता

# प्रदीप कुलकर्णी यांनी साहित्यात उच्चांक गाठला- स्नेहल पाठक



**( वादळवार्ता प्रतिनिधी )**

माजलगाव (प्रतिनिधी) :- माजलगावात साहित्य चळवळ आहे, साहित्यिक ही भरपुर आहेत. अनेकांचे लिखाण खुप सुंदर आहे. हे सगळे असले तरी प्रदीप कुलकर्णी यांनी 'प्रेमात पडायचे होते पण' ही कादंबरी प्रकाशीत करुन माजलगाव च्या साहित्य चळवळीत उच्चांक गाठला आहे. यामुळे त्यांचे खरच कौतुक करावे तेवढे कमीच आहे अशा शब्दात प्रदीप कुलकर्णी यांच्या बद्दलच्या भावना प्रेमात पडायचे होते पण या कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना प्रा.स्नेहल ताई पाठक यांनी व्यक्त केल्या.

श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या सभागृहात प्रदीप कुलकर्णी लिखीत प्रेमात पडायचे होते पण या कादंबरीचा प्रकाशन सोहळा अत्यंत आनंदात आणि उत्साही वातावरणात दि. 18 मे 2024 रोजी सायंकाळी 6 वाजता संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे अध्यक्ष आर.जी.कानडे हे होते.

प्रारभी मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती देवीचे पुजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार भगवंत हावरगावकर, सौ. भाग्यश्री हावरगावकर, सौ. आनंदी कुलकर्णी, रविंद्र सोनवळकर यांच्या हस्ते करण्यात आला. लेखक प्रदीप कुलकर्णी यांचा मंगलनाथ परिवाराच्या वतीने भव्य दिव्य असा सत्कार करुन त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. या वेळी ॲड. रविंद्र कानडे, ॲड. सुनिल सौंदरमल, पत्रकार बालासाहेब फपाळ, कवि प्रकाश पत्की, भिमराव होके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र सोनवलकर यांनी केले.

कार्यक्रमाचे शेवटी शाश्वती अर्बन चे चेअरमन नंदकुमार हावरगावकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास माजलगाव शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यात वकील साहित्यिक, पत्रकार, वाचक यांच्यासह श्री मंगलनाथ मल्टीस्टेट च्या कर्मचाऱ्यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मनोज जरांगे पाटील पुन्हा आक्रमक, मुंडे बहिण-भावावर आरोप करत दिला मोठा इशारा

**(पुसद प्रतिनिधी)**

मराठा आरक्षणावरुन सरकारला घाम फोडणारे मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. बीडच्या मुंडे बहिण-भावावर जरांगे पाटलांनी हल्लाबोल केलाय. मुंडे बहिण-भाऊ समाजाला फूस लावून धमक्या देत असल्याचा आरोप जरांगे पाटलांनी केलाय. मुंडे-बहिण भावाकडून मला धमक्या, असा आरोपही मनोज जरांगे यांनी केला आहे. त्यावर पंकजा मुंडे यांनी "कोणीतरी बोलतं. त्यावर बोलण्याची आवश्यकता नाही", अशी प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान, जरांगे पाटील आणि पंकजा मुंडेंच्या वादाला सुरुवात ही मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन झाली होती. उपोषण करुन कुणाला आरक्षण मिळत नसल्याचं विधान पंकजा मुंडेंनी केलं होतं. यानंतर जरांगे पाटलांनी देखील त्यांना प्रत्युत्तर देत इशारा दिला होता. "उपोषण करुन आरक्षण मिळत नसतं", असं पंकजा मुंडे म्हणाल्या. त्यावर "तुमच्या वाटेला गेलो नाही, माझ्या वाटेला येऊ नका", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. तर "वर्षभरात मी जरांगे पाटलांचं नावच नाही घेतलं", असं मनोज जरांगे म्हणाले.

मनोज जरांगे यांचा मोठा इशारामराठा आरक्षणावरुनही जरांगे पाटील आक्रमक झाले आहेत. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी न झाल्यास विधानसभेला 288 जागा लढवणार असल्याचा इशाराही यावेळी जरांगे पाटलांनी दिलाय. "सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी न केल्यास विधानसभेत 288 मतदारसंघात उमेदवार देणार", असं मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.मराठा आरक्षणावरुन मनोज जरांगे पाटलांनी मराठा नेत्यांना देखील धारेवर धरलंय. तसंच विधानसभा निवडणुकीत मराठा नेत्यांचं नाव घेऊन पाडायला लावणार असल्याचा इशारा देखील त्यांनी यावेळी दिलाय. दरम्यान, भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांनी महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. "जरांगे आणि आमचं कोणतंही भांडण नाही", असं रावसाहेब दानवे यांनी म्हटलं आहे.

मनोज जरांगे पाटलांनी मुंडे बहिण-भावावर आरोप करत हल्लाबोल केलाय. दरम्यान आडवे आल्यास बघून घेण्याचा इशाराही यावेळी जरांगे पाटलांनी दिलाय. या प्रकरणात आता काय-काय घडामोडी घडतात, ते पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे.

## कविता

# रानातली अंगाई

बाळ बांधुनी पाठीशी
पाटी घेवोनिया डोई
अनवानी चाले वाट
पांदीतून घाई घाई

न्याहारीची वेळ झाली
साद घालते धन्याला
चटणी भाकरीला तिच्या
चव कष्टाळू हाताला

ताट धन्यापुढे सारी
एक हात वाढपाला
पान्हा उरामध्ये दाटे
बाळ चिटीते स्तनाला

बाळासाठी झोळी तिच्या ,
तिने झाडाला टांगली
हाती घेवोनिया विळा
माय पाथला वाकली

येता आठव तान्ह्याचा
धावे लगबगे आई
चिऊकाऊ बाळासाठी
गाती झाडावं अंगाई

------------------------------------------

सचिन बेंडभर
पिंपळे जगताप, पो- करंदी
ता- शिरूर जि- पुणे 412208.
Mob- 9822999306
Mail- sachinbendbhar3@gmail.com

# मदर्स डे

माझ्या आयुष्यात कोणी जर सर्वात जास्त प्रभाव टाकला असेल, तर ती आहे माझी आई.खूप साऱ्या गोष्टी शिकवल्या आहेत तिने मला माझ्या जीवनात . नवीन बदल घडत असताना मला साथ दिला . अशा त्या सर्व गोष्टी मला पूर्ण आयुष्य कामात येतील , शिकवल्या म्हणून मी सर्वांना गर्वाने सांगू इच्छितो की माझी आई माझा आदर्श आणि गुरु आहे. ती माझी प्रेरणा स्त्रोत आहे. “ आई “ हा शब्द आहेस तर दोन शब्दांचा पण या शब्दांत सम्पूर्ण सृष्टि समावलेली आहे . आई हा शब्द असा एक शब्द आहे ज्याच्या महत्त्वाबद्दल जितके सांगावे ते कमीच आहे. आई शिवाय आपण सुखी जीवनाची कल्पना देखील करू शकत नाही . आईच्या महानतेचा अंदाज आम्ही या गोष्टीवरून करू शकतो की एका वेळेला व्यक्ती देवाचे नाव घेणे विसरेल पण आई चे नाव विसरत नाही. आई करुणा आणि प्रेमाची प्रतीक आहे . जगभराचे कष्ट सहन करून सुद्धा एक आई आपल्या मुलाला चांगल्यात चांगली सुख सुविधा देण्याचा प्रयत्न करते. आपल्या मुलांशी आई खूप जास्त प्रेम करते . ती एका वेळेला स्वतःउपाशी झोपेल पण आपल्या पोरांना जेवण देणे विसरणार नाही . सर्वांच्य जीवनात त्यांची आई एक शिक्षकापासून पालनकर्ता पर्यंत च्या महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते म्हणूनच आपल्याला आपल्या आईचा कायम सन्मान करायला हवा. ‘आई हा संसारातील सर्वात महत्वाचा व्यक्ती आहे. मुलांना जन्म देण्याची प्रथम कृती असते. मुलांना जन्म देणं हे तिच्यासाठी जगातली सर्वात मोठा उत्साह आणि उत्सुकता असते. आई तिच्या संपूर्ण जीवनात तिच्या मुलांना आनंदात ठेवण्यासाठी प्रयत्न करीत असते. तिने दिलेल्या संस्कारामुळे आपण घडत असतो. माझी आई सुद्धा मला घडविण्यासाठी दिवस रात्र कष्ट घेत असते. ती सकाळी लवकर सगळ्यांच्या अगोदर उठते. देवपूजा करते. स्वयंपाक करते व माझा अभ्यासही घेते. माझ्यासाठी छान छान पदार्थ देखील बनवते. घरातील प्रत्येक व्यक्तीला काय हवं नको याकडे तिचे बारीक लक्ष असते. मी कधी आजारी पडलो तर ती रात्रभर जागते आणि माझी काळजी घेत असते. माझी आई मला नवनवीन गोष्टी शिकवीत असते. काय चांगले व काय वाईट याबद्दलही सांगत असते. माझ्याकडून काही चूक झाली किवा मी चुकीचे वागले तर रागावतेसुद्धा पण नंतर प्रेमाने जवळही घेते. तिचा मला खूप आधार वाटतो. माझी आई मला खूप खूप आवडते. आपल्याला जन्म देऊन जगात आणणारी आई एखाद्या देवाप्रमाणे आपले आयुष्य घडवते. आई म्हणजे आपल्या मुलांवर निरंतर माया लावणारी, सतत त्यांची काळजी घेणारी, निस्वार्थ मनाची देवाच्या रूपात अवतरलेली मूर्ती. .....आई’ हा शब्द जगातील अतिशय प्रेमळ आणि सुंदर शब्द आहे. आई हा शब्द जरी साधा, सोपा वाटला तरी संपूर्ण जगाला सामावून घेण्याची ताकद या शब्दात आहे. आपण आईशिवाय जीवनाची अपेक्षाच करू शकत नाही, म्हणून आपण आईचे महत्त्व जाणून घेतले पाहिजे. खरंतर शब्दांत, माझ्या आईची थोरवी सांगण्यासाठी मला शब्द देखील अपुरे पडतील. आईंचे महत्व सांगण्याएवढी मी नक्कीच मोठी नाही. तरीही माझ्या जीवनातील सर्वात महत्वाच स्थान असणारी ‘माझी आई’ तिच्याबद्दल मी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

गेल्या अनेक वर्षात स्त्रियांवर होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. प्रत्यक्षात सरकारी आणि सामाजिक संस्थांनी स्त्री अत्याचाराची जी आकडेवारी उपलब्ध करून दिली आहे, ती पोलीस स्टेशनला प्रत्यक्ष नोंद होणाऱ्या तक्रारीवरून दिली आहे. परंतु नोंद होणाऱ्या घटनांपेक्षाही अनेक कारणांमुळे अंधारात राहणाऱ्या घटनांची संख्या जास्त आहे. खालील आकडेवारीवरून एक नजर टाकली तर स्त्री अत्याचाराचे भीषण वास्तव दिसून येईल. स्त्रियांवरील अन्याय/ अत्याचार दूर करण्यासाठी प्रभावी कायदे आणि त्याची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहेच, परंतु त्याबरोबरच आवश्य आहे ती जनजागृती. स्त्रियां/मुलींना मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे. आणि शाळा, कॉलेज, स्वयंसेवी संस्था यांनी प्रयत्न करून हे उपक्रम राबवले पाहिजेत. आजकाल प्रेमप्रकरणांमध्ये झालेली वाढ लक्षात घेता मुलगा आणि मुलगी या दोघांचेहि समुपदेशन करण्याची गरज आहे. प्रेम करणे ही वाईट गोष्ट नाही. परंतु प्रेमाच्या नावाखाली अश्लीलतेचा जो नंगानाच चालू असतो, तो फार भयंकर आहे. महाविद्यालयीन तरुण-तरुणी यात फारच आघाडीवर आहेत. अनेक तरुणांची जी प्रेम प्रकरणेचालू आहेत, ते आपल्या जोडीदाराबरोबर निर्जन स्थळी जाऊन अश्लील चाळे करतात (अपवाद आहेत.) हे निश्चितच सामाजिक हिताचे लक्षण नाही. प्रेम ही उदात्त भावना बाजूलाच राहते आणि वासनेचा बाजार सुरू होतो. अशा घटनांमध्ये बहुतांशी वेळा मुलीच बळी ठरतात. महिलांना आजच्या युगात दिले जाणारे स्थान हे खालच्या पातळीचे आहे. परंतु आता सरकारने केलेले कायदे हे फार महत्त्वाचीभूमिका पार पडत आहेत . महिलांना दिले जाणारे स्थान आता हल्लीच्या काळात बदलत जात आहे. परंतु हा बदल होत असताना असे जाणवते कि, खरच हा बदल होतो आहे का? कारण आपण प्रत्येकजण म्हणतो कि, स्त्रियांना त्यांचे सर्व अधिकार दिले गेले पाहिजेत. त्यांचे हक्क प्रदान केले पाहिजेत. पण खरे पाहिले असता पुरुषप्रधान संस्कृतीत मात्र महिलांना दुय्यमच स्थान आजही दिले जात असलेले दिसून येते. आजही अनेक ठिकाणी मुलगी जन्मास आली कि, तिला घरातुनच वागणूक व्यवस्थित मिळत नसल्याचे दिसते. हीच स्त्री आज पुरुषाच्या खांद्यास खांदा लाऊन प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तुत्व सिद्ध करीत असतानाही तिला आजही पुरुषी अंहमपनाचा सामना करावा लागतोय.आजही काही क्षेत्रात महिलाना दुय्यम स्थान दिले जाते. आता सर्व बंद आहे, पण आपल्या आईला, ताईला आणि बायकोला सर्व काही कामापासून सुटका नाही. आजही काही ठिकाणी महिलांना अत्याचार सहन करावा लागतो आहे. परंतु पुरुष हे कधी स्त्रीयांवर होणारा अन्याय बंद करतील. काही मुलिंना कसे कपडे परिधान करायचे, या गोष्टी वरून पण बोलताना पहिले आहे.असा म्हणतात स्त्रीयांना आणि पुरुषांना समान हक्क आहे.पण नेहमी स्त्रीयांना दुय्यम हक्क मिळतो. जेव्हा एक पुरुष शिकतो तेव्हा तो एकटाच सुशिक्षित होतो मात्र जेव्हा एखादी महिला शिकते तेव्हा तिची पूर्ण पिढी सुशिक्षित होऊ शकते. ती आई आहे, ती ताई आहे, ती मैत्रिण आहे, ती पत्नी आहे, ती मुलगी आहे, ती जन्म आहे, ती माया आहे, ती सुरुवात आहे आणि तिच नसेल तर सारं काही व्यर्थ आहे.स्त्री म्हणजे वास्तव्य, स्त्री म्हणजे मांगल्य, स्त्री म्हणजे मातृत्व, स्त्री म्हणजे कतृत्व.

मुलींच्या शैक्षणिक पातळीत सुधारणा केल्याने तरुण स्त्रियांच्या आरोग्यावर आणि आर्थिक भविष्यावर स्पष्ट प्रभाव पडतो, ज्यामुळे त्यांच्या संपूर्ण समाजाच्या भविष्यात सुधारणा होते. ज्या बालकांच्या मातांनी प्राथमिक शिक्षण घेतले आहे त्यांचा बालमृत्यू दर ज्यांच्या माता निरक्षर आहेत त्यांच्या तुलनेत अर्धा आहे. जगातील सर्वात गरीब देशांमध्ये, ५०% मुली माध्यमिक शाळेत जात नाहीत. तरीही, संशोधनात असे दिसून आले आहे की मुलींच्या शाळेतील प्रत्येक अतिरिक्त वर्ष त्यांच्या आजीवन उत्पन्नात १५% वाढ करते. स्त्री शिक्षण सुधारणे, आणि अशा प्रकारे महिलांची कमाई क्षमता, त्यांच्या स्वतःच्या मुलांचे जीवनमान सुधारते, कारण स्त्रिया त्यांच्या कुटुंबात पुरुषांपेक्षा जास्त उत्पन्न गुंतवतात. तरीही मुलींच्या शिक्षणात अनेक अडथळे कायम आहेत. काही आफ्रिकन देशांमध्ये, जसे की बुर्किना फासो, मुलींसाठी खाजगी शौचालय सुविधांचा अभाव यासारख्या मूलभूत कारणांमुळे मुली शाळेत जाण्याची शक्यता नाही. शिक्षणामुळे स्त्रीची (आणि तिच्या जोडीदाराची आणि कुटुंबाची) आरोग्य आणि आरोग्य जागरूकता वाढते. स्त्रियांच्या शिक्षणाच्या आणि प्रगत प्रशिक्षणाच्या स्तरावर पुढे जाण्यामुळे लैंगिक क्रियाकलाप, पहिले लग्न आणि पहिले बाळंतपण विलंब होऊ शकतो. शिवाय, अधिक शिक्षणामुळे अविवाहित राहण्याची, मुले नसण्याची किंवा दीर्घकालीन भागीदारीची पातळी वाढवताना औपचारिक विवाह न होण्याची शक्यता वाढते. महिलांच्या आरोग्यासाठी देखील महिलांचे शिक्षण महत्त्वाचे आहे, लैंगिक संक्रमित संसर्ग कमी करताना गर्भनिरोधक वापर वाढवणे आणि घटस्फोट घेणाऱ्या किंवा घरगुती हिंसाचाराच्या परिस्थितीत असलेल्या महिलांसाठी उपलब्ध संसाधनांची पातळी वाढवणे. शिक्षण महिलांचा भागीदार आणि नियोक्त्यांसोबतचा संवाद आणि नागरी सहभागाचे दर सुधारते.

**प्रभावती संदिप नांदेडकर**


# भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदी अविनाश कच्छवे.

## तर माजलगाव संघटक पदी साहित्यिक अंगद दराडे यांच्या नावाची घोषणा

**वादळवार्ता/माजलगाव**

माजलगाव.. मराठवाड्यात सामाजिक कार्यकर्ते व परभणी जिल्ह्यातील एक चांगल व्यक्तिमत्व अविनाश कच्छवे यांचे सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य पाहून समितीच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली नुकतीच मुंबई येथे कार्याची दखल घेऊन एम बी फड साहेब यांच्या शिफारशीनुसार निवड करण्यात आली आहे. भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष रबिन्द्र द्विवेदी साहेब व भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय कार्यवाहक अध्यक्ष आलोक रबिन्द्र द्विवेदी साहेब यांच्या हस्ते कच्छवे यांना नियुक्तीपत्र ओळखपत्र देण्यात आले आहे. मराठवाड्यात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे, काम अधिक जोमात करणार असुन त्यांच्या व विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही असे कच्छवे यांनी विश्वास व्यक्त केला त्यांच्या निवडीबद्दल भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष मधुकर पतंगे, मराठवाडा अध्यक्ष बालाजी चाटे व बीड जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके संजय तिखे पाटिल दक्षिण महाराष्ट्र अध्यक्ष बाळासाहेब इथापे महाराष्ट्र सचिव अनंत वरवटे तुळशीराम लुंगारे तसेच बीड जिल्हा उपाध्यक्ष मधुकर ढगे माजलगाव तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर गायकवाड उपाध्यक्ष गणेश तोर माजलगाव संघटक अंगत दराडे धारूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब सोळंकेआदींनी अभिनंदन केले आहे.




ANTI CORRUPTION COMMITTEE™
ALIAS
भ्रष्टाचार निर्मूलन समिती
REGD. : MAH / 339 / 98 / THN
Regd. Office : Kamini Niwas, Pandurang Wadi, Mira, Thane-401 107.
Ph. : 2845 8804, 5577, 4916, 7143, 5915, 5617, 5720 Fax No. : 2845 7133 - 4758
Email : bhrastacharnirmulansamiti@gmail.com

Rabindra Dwivedi, National President, 022-28458804/28455577
Umesh Dwivedi, General Secretary, 011-25106777
Adv. Mohd Sayeed Ahmed, National Spokesman, 9440385478
Mairaj Khan (National President Mahila Wing) 9652421097
M Bikshapathy, National Observer, 9391007098
Vijay Marlecha - National PRO, 9225506774
Ugra Narayan Jha, National Vigilance Officer, 98200 17104
Madhukar Patange (President Maharashtra) 8623009572
Dilip Shah - President Mumbai, 9821722154
Salim Malik, President Delhi, 9891886378
Mukesh Khatri, President Gujarat Pradesh, 9898112112
Subhash Sharma, President Himachal Pradesh, 0177-2620674
Ayush Bansal, President Punjab Pradesh, 9779669303
Anup Mandal, President Bihar, 9546992528
Gopal P. Mishra, President Karnataka, 9916603164
Sujit Singh - President U.P., 9161620686
Mohan P - President Kerala, 9221329614
Umakant Singh, President West Bengal, 9831925934
Kavinder Phagna, President Haryana, 9311005062
Ajit Singh Tuteja - President M. P., 9826285455
Din Dyal Vyas, President Rajasthan, 9414137179
Santosh Patra - President Orissa, 9861012018
Jai Prakash Prasad, President Jharkand, 9234221299
Lalit Kataria, President Tamilnadu, 9444246285
Sunil Mishra, President Chattisgarh, 9425237021
Jitendra Kapoor, President Uttarakhand, 9837137816
Kumar Rajnish - President Assam, 9435850545
Kamlesh Kumar - Observer Tamil Nadu, 9444043233
Devendra Dhami, President North Range, 9825409089
Umesh Maurya, Observer Delhi, 9136282628
Sohail Farooqui, President Telangana, 9391143306

Ref. No. : BNS/82/24/THN
Date : 18.05.2024
I.C. No-1507548.

To,
AVINASH BABARAO KACHVE
TEERTHROOP NIWAS,
HOUSE No-29,
SOUTH SHIVRAM NAGAR,
DIST-PARBHANI,
MAHARASHTRA.

Dear Sir / Madam,

I have pleasure to inform that you been appointed as ,
VICE PRESIDENT MARATHWADA REGION,MAHARASHTRA
State of Anti Corruption Committee alias Bhrastachar Nirmulan Samiti which works towards the Eradication of Corruption.

This Appointment will effect immediately. You are requested to send list of New 15 Committee Member's within fifteen days.

We hope you will work honestly and bring hopes to the reputation of Anti Corruption Committee alias Bhrastachar Nirmulan Samiti.

With Good will, wish and best regards.

Your's faithfully

Rabindra Dwivedi
(National President)

CENTRAL OFFICE ; H-27, II Floor, Main Market, Rajouri Garden, New Delhi : 110 027. ✆ : 25106777, 2541001 Fax-25463011
Chennai : 9444043233, Calcutta : 033-28775498, 0565-403166, Hyderabad : 9989491423 Fax: 65765588, Ludhiyana - 9814125509
Bihar : 7909000546, Simla : 0177-2620674, Mathura : 0565-403166, Nanded : 02452-230857, 245899, Rajkot : 0281-2458304

# लोकसभेच्या निवडणुकी मुळे महाराष्ट्रातील बीजेपीचे त्रिमूर्ती सरकार दुष्काळ हाताळण्यात अपयशी-वसंत मुंडे

वादळवार्ता/परळी वैद्यनाथ महाराष्ट्रामध्ये १९७२ च्या नंतर २०२४ ला खूप मोठा दुष्काळ पडला पण निष्क्रिय महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकार सर्व बाजूंनी दुष्काळ हाताळण्यास अपयशी ठरल्याचा आरोप महाराष्ट्र ओबीसी काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. २०२३ च्या खरीप व रब्बी मध्ये पावसाने खूप मोठ्या प्रमाणावर ओढ दिल्यामुळे जनावरासाठी चारा छावण्या, पाणी पुरवठा संदर्भातील संकट संपूर्ण राज्यामध्ये उभे राहिले असून ग्रामीण व शहरी भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणावर आज जाणवत आहे. शासनाकडून तलावातील पाणीसाठा ,विहीर बोर अधिग्रह करण्यास विलंब प्रशासनाकडून झालेला आहे. महाराष्ट्रातील आपत्ती व्यवस्थापनाकडून सर्व विभागीय महसूल आयुक्तांकडून जिल्हास्तरीय तालुकास्तरीय मंडळ निहाय तात्काळ अहवाल मागून सर्व दुष्काळा हाताळण्या संदर्भातले निकषाचे पालन करण्यास शासन स्तरावर तातडीचे आदेश देण्यात आले परंतु प्रशासनाकडून हाताळण्यास राजकीय दबावापोटी विलंब झाल्याचा आरोप काँग्रेस नेते वसंत मुंडे यांनी केला . शासन स्तरावरून दुष्काळातला विविध सवलती बाबत शासनाकडून आदेश देऊनही बँका शेतकऱ्याकडून वसुलीची कारवाई करीत आहेत, त्यांचे खाते घोटवित आहेत. तरीही प्रशासनाकडून शेतकऱ्याला दिलासा



देण्यासंदर्भात ठोस पावले उचलली जात नाहीत, शेतीवरील कर्ज वसुलीसाठी थांबवणे व त्याचे पुनर्गठन करणे, कृषी पंपाचे वीज बिलात नियमानुसार सवलत देणे, रोजगार हमीचे कामे चालू करणे, पिण्याचे पाणी टँकर द्वारे पुरवठा करणे , शालेय विद्यार्थ्यांचे संपूर्णपणे फी माफ करणे, सुशिक्षित तरुण पिढीतील सर्व युवकांसाठी " विशेष बाब " म्हणून रोजगार उपलब्ध करून देणे असे शासनाकडून दुष्काळा संदर्भात आदेश जरी असले तरी तालुकास्तरीय जिल्हास्तरीय विभाग स्तरीय प्रशासनाकडून हाताळण्यास विलंब झालेला आहे.शेतकऱ्यासाठी अतिवृष्टीचे, दुष्काळ निधी व २०२० पासून आज तागाचे पीक विम्याचे पैसे तात्काळ शेतकऱ्याच्या बँकेच्या खात्यात वर्ग करणे, कृषी पंपाची वीज तोडण्यात येऊ नये . पावसाने ओढ दिल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर राज्यात नैसर्गिक आपत्ती तयार झाली असून शेतकऱ्याच्या शेतीमालाचे बाजारपेठेत अवमूल्यन झाले आहे . शासनाकडून शेतीमाला बाबतीत आयात, निर्यात धोरण केंद्र व राज्य सरकारच्या चुकीचे हाताळले जात आहे . लोकसभेच्या निवडणुकीमुळे महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकारकडे दुष्काळ हाताळण्यात संपूर्णपणे अपयश आल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी चे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे नी केला.




वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते पुरुषोत्तम वीर व समाज कल्यान आयुक्त भगवान वीर यांचे औरंगाबाद येथील नवीन वास्तुशांती गृहप्रवेशा निमित्त औरंगाबाद येथे शुभेच्छा देते प्रसंगी संपादक बालाजी जगतकर, लक्ष्मण तात्या मस्के,गणेश धोंडरे, बंडू निसर्गान, भूषण लोळगे, रंजित वाघमारे,आदी दिसत आहेत.

# पूर्व विभागातील नागरी समस्या सोडविण्या साठी दोन दिवसीय लाक्षणिक उपोषण

दैनिक वादळ वार्ता

उरण /विठ्ठल ममताबादे

उरण तालुक्यातील पूर्व विभागातील खोपटे ते कोप्रोली रस्ता सुसज्ज व्हावा, खोपटे गावात भीषण अपघात होऊन निलेश म्हात्रे या मृत तरुणाला नवी मुंबई परिवहन सेवा (एन एम एम टी )तर्फे त्वरित आर्थिक नुकसान भरपाई मिळावी तसेच ह्या अपघातातील गंभीर जखमी केशव ठाकूर यांना त्वरित आर्थिक नुकसान भरपाई मिळावी. पूर्व विभागातील शेत जमिनीतून गेल इंडियाच्या जाणाऱ्या पाईपलाईनला शेतक-यांचा विरोध आहे.



उरण पूर्व विभाग मित्र परिवार

या पाईपलाईन मध्ये शेतकऱ्यांना प्रशासनाने विश्वासात घेऊन त्यांच्या सर्व मागण्या मान्य कराव्यात. जेएनपीटी हायवेवर होत असलेले अपघात आणि बेशिस्त अवजड वाहनांची वाहतूक व अनधिकृत पार्किंग बंद व्हावे. तसेच खोपटा ते कोप्रोली रस्ता एनएचएआय आणि पीडब्लूडी मधील वादामुळे रस्ता झाला नाही तो रस्ता सुसज्ज करावा.या सर्व प्रमुख समस्या सोडवाव्यात. तसेच विविध मागण्यासाठी 'उरण पूर्व विभाग मित्र परिवार' या सामाजिक संस्थेतर्फ २४ मे व २५ मे २०२४ रोजी दोन दिवसीय लाक्षणीक उपोषण करण्यात येणार आहे. सदर समस्या विषयी उरण पूर्व विभाग मित्र परिवारातर्फे यापूर्वीही प्रशासनासोबत वारंवार पत्रव्यवहार देखील करण्यात आला आहे. मात्र उरण पूर्व विभागातील जनतेच्या या महत्वाच्या समस्याकडे प्रशासनाचे जाणून बुजून दुर्लक्ष होत आहे. लोकशाही, कायदेशीर मार्गाने शांततेच्या मार्गाने लढा लढून, पत्रव्यवहार करुन सुद्धा सर्वसामान्य जनतेला न्याय मिळत नसल्याने उरण पूर्व विभाग मित्र परिवारा तर्फे २४ मे २०२४ पासून दोन दिवसीय लाक्षणिक उपोषणाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती उरण पूर्व विभाग मित्र परिवाराचे सदस्य गोरख ठाकूर यांनी दिली आहे.

# माजलगाव पोलि़सांची दबंग कामगिरी दहशत माजवणाऱ्या गुंडाच्या मुसक्या आवळल्या

माजलगाव : 9 मे रोजी शहरातील हनुमान चौक, दबडगावकर कॉलनी याठिकाणी दोन गुंडानी नशेत तर्रर होऊन रस्त्यावरून जाणाऱ्या काही युवकांना, घरासमोर उभ्या पती पत्नीस, तसेच संजय एजन्सी या मेडिकल दुकानात घुसून दुकानातील युवकांना फायटर या शस्त्रने मारहाण केल्याची घटना घडली होती या प्रकरणी उपविभागीय पोलिस अधिकारी बी धीरजकुमार यांनी लक्ष घालून आज या दोन्ही आरोपीना अटक केली.या आरोपीना एक दिवसा ची पोलिस कोठडी मिळाली आहे. शहर पोलिस ठाण्याचे पी आय केतन राठोड यांच्या कामगिरी मुळे व्यापारी व केमिस्ट असोसिएशन कडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

याबाबत अंनत सदाशिव विभुते वय 38 वर्षे व्यवसाय मजुरी रा. जिजामातानगर माजलगाव ता. माजलगाव याने दिलेल्या फिर्यादित राधेशाम जेथलीया यांचे संजय एजन्सी येथे दिनांक 09/05/2024 रोजी सांयकाळी अदाजे 05.00 ते 05.30 वाजता काम करत आसतांना अचानक दोन अनओळखी इसम दुकानाध्ये घुसले व दोघांनी लोखंडी स्टुल उचलले व डोक्यात मारले असल्याचे तसेच त्यापैकी एकाचे हाताचे बोटामध्ये लोखंडी फायटर होते. त्यांने फिर्यादीच्या डाव्या हाताचे मंनगटाचे जवळ फायटर मारले व दुखापत केली तसेच त्या दोघांनी मिळून संजय एजन्सी या दुकानातील कॉप्युटर व प्रींटर फोडले व मालाची नासधूस केली तसेच कामगारांना मारहाण केली होती या प्रकरणी सोन्या दराडे व शेख बबू या आरोपीवर 324,327,452 नुसार गुन्हा दाखल झाला होता. या दोन्ही आरोपीना आज पहाटे अटक केली असून दोघांना 1 दिवसाची पोलिस कोठडी न्यायालयाने सुनावली.सहाय्यक पोलीस अधीक्षक धीरज कुमार बच्चू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक केतनकुमार राठोड, पोहवा/माधव तोटेवाड, पोहवा/ गणेश तळेकर, अंमलदार गणेश ठेंगल यांनी ही कारवाई केली.

# लोह्यात वासवी माता जन्मोत्सव उत्साहात साजरा

वादळवातो/लोहा

लोहा शहरात आर्य वैश्य समाजाच्या वतीने नगरेश्वर मंदिर लोहा येथे वासवी माता कन्यका परमेश्वरी यांचा जन्मोत्सव समाज बांधवांकडून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . यावेळी नगरेश्वर मंदिर चे अध्यक्ष दिनेश तेललवार, सोमनाथ भोस्कर,तुकाराम सा.कोटलवार,संजय अंकुलवार,जितेंद्र व राहूल कोटलवार,अशोक पेडगुलवार,श्रीनिवास मोतेवार, दिपक रुद्रवार,राहूल बिडवई,भूषण व राजू दमकोंडवार विजय तेललवार,एकनाथ कटकमवार,मनोज महाजन,संजय चालिकवार,आनंद भोस्कर यांच्यासहित मोठ्या संख्येने आर्य समाज बांधव व महिला भगिनी उपस्थित होते.



# पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुका अध्यक्ष पदी रंजित घाडगे तर सचिव पदी दिनकर जाधव यांची निवड





वादळवार्ता/केज

राष्ट्रीय स्तरावर संपूर्ण देशभर काम करणार्या पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुका अध्यक्षपदी रंजीत घाडगे तर सचिव पदी दिनकर जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

पुरोगामी विचारांचा वारसा जपण्यासाठी व पुरोगामी विचारांची चळवळ तेवत ठेवण्यासाठी या पुरोगामी पत्रकार संघाची स्थापना केली असून गेल्या सहा वर्षांमध्येच या पत्रकार संघाच्या शाखा संपूर्ण देशामध्ये प्रत्येक राज्यामध्ये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापन झाल्या आहेत. याच विचाराचा प्रचार आणि प्रसार तसेच पत्रकारांच्या हितासाठी योग्य निर्णय व्हावेत यासाठीच संस्थापक अध्यक्ष विजय सुर्यवंशी यांनी पुरोगामी पत्रकार संघाची स्थापना केली आहे. याच पुरोगामी पत्रकार संघाच्या केज शाखेच्या तालुकाध्यक्षपदी रंजीत तात्याराम घाडगे यांची पुनर्निवड करण्यात आली आहे तर दिनकर किसनराव जाधव यांची केज तालुका सचिव पदावर निवड करण्यात आली आहे. त्यांना निवडीचे पत्र नांदेड येथे शनिवार दि.१८ मे रोजी झालेल्या पुरोगामी पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनामध्ये संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, राज्य अध्यक्ष संतोष जाधव, मडाठवाडा प्रदेश उपाध्यक्ष मुबाशीर खतिब तसेच बीड जिल्हा अध्यक्ष दत्ता मुजमुले यांच्या हस्ते देण्यात आले.

या त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे हितचिंतक, मित्र, नातेवाईक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळीकडून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# तत्कालीन तहसीलदार देशमुखावर होणार शिस्तभंगाची कारवाई तलाठी बंडू आव्हाड यांना ३० दिवसात खुलासा सादर करण्याचे आदेश

## खुलताबाद तहसील प्रशासनाला माहितीच्या अधिकाराचे वावडे काय? असा संतप्त सवाल

**दैनिक वादळ वार्ता**

**खुलताबाद/प्रा संजय तुपे**

खुलताबाद तहसील कार्यालयात माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत तलाठी बंडू आव्हाड यांनी कलम ७(१) चा शिस्तभंग केल्याप्रकरणी कलम १९(८) ग व कलम २० एक नुसार कारवाई करण्यात येऊ नये याचा तीस दिवसात खुलासा द्यावा असे प्रथम अपिलय अधिकारी तत्कालीन तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांनी कलम १९(६) चा शिस्तभंग केल्यामुळे शिस्तभंगाची कारवाई करावी असा आदेश राज्य माहिती आयोगाने विभागीय आयुक्तांना दिला आहे वीरेंद्र सिताराम वाघ यांनी तहसील कार्यालय या ठिकाणी अवैध उत्खनन वाहतूक करणाऱ्या वाहनावर तहसील कार्यालयाचे आवारात १२ ते १५ अवैध माती व मुरूम उपसा करणाऱ्या ट्रॅक्टर जप्त करण्यात आले होते मात्र या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र वाघ यांनी याविषयी माहितीसाठी माहिती अधिकारात अर्ज दाखल केला होता जन माहिती अधिकार तथा दोन काय म्हटले आहे आदेशात जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा खुलताबाद बंडू आव्हाड यांनी कलम ७(१) चा शिस्तभंग केला त्यामुळे मागितलेली माहिती अंदाज अर्जदारास कलम ७(६) नुसार विनामूल्य द्यावी व १९(८ ग )व कलम २०(१) च्या तरतुदीनुसार ठरविका करण्यात येऊ नये याचा खुलासा ३० दिवसाच्या आत आयोगात सादर करावा खुलासा अमान्य झाल्यास पंचवीस हजार रुपये दंड व शिस्तबंगाची कार्ये होऊ शकते त्याचप्रमाणे प्रथम आपली अधिकारी तत्कालीन तहसीलदार देशमुख यांनी कलम १९ सहा चा अभंग केला म्हणून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी असे विभागीय आयुक्त कार्यालयाला आदेशित केले आहे तलाठी बंडू आवडणे ३० दिवसात माहिती देण्यास टाळाटाळ केली म्हणून अर्जदार वाघ यांनी प्रथम आपली अर्ज दाखल केला होता परंतु प्रथम आपली अधिकारी तथा तत्कालीन तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांनी कुठलीही प्रतिसाद दिला नाही म्हणून अर्जदार वाघ यांनी नाराजीने राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे द्वितीय पिलीय अर्ज केला होता या प्रकरणी द्वितीय अपिलय अधिकारी राज्य माहिती आयोगाने सुनावणी घेतली अर्जदार वाघ यांनी स्वतः युक्तिवाद केला त्यानंतर आदेश पारित केला तहसील प्रशासनाच्या कामात पारदर्शकतापणा असेल तर माहिती देण्यास काय अडचण आहे असे सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे त्यामुळे नक्कीच तहसील प्रशासन काय लपविण्याचा प्रयत्न करीत आहेत हे जनतेला जाणून घ्यायचे आहे सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र वाघ कडून होत आहे



# माजलगावात तीन चिमुकल्याना नातेवाईकांनी सोडले पुंगनीच्या पुलावर.

## आई-वडिलांच्या ताटातुटीत मुलांची तारांबळ.



**माजलगाव प्रतिनिधी दि.18**

तीन चिमुकल्या मुलांना त्यांच्या नातेवाईकांनी माजलगाव तालुक्यातील पुंगनी गावच्या पुलावर पुलावर बेवारस सोडून दिले.ही घटना रविवारी गावकऱ्यांच्या लक्षात आली. पोलिसांनी मुलांना ताब्यात घेऊन अनाथ आश्रमात पोहोचवण्याची व्यवस्था केली आहे. दरम्यान आई-वडिलांच्या बेबनाव ताटातुटीत तीन चिमुकल्यांची मोठी तारांबळ होत आहे. याबाबत समजलेली माहिती अशी की,गेवराई तालुक्यातील बोरी पिंपळगाव येथील ज्ञानेश्वर जाधव यांचा माजलगाव तालुक्यातील पुंगनी येथील महिलेसोबत विवाह झाला होता. दरम्यानच्या काळात त्यांना आर्यन(वय 6 वर्षे) अनिकेत (4 वर्षे)व आराध्या (2 वर्ष) अशी तीन मुले झाली.उभयतांत काही दिवसापूर्वी वाद झाल्याची गावकऱ्यात चर्चा आहे.यामुळे मुलांचे वडील ज्ञानेश्वर मोठ्या शहरात वास्तवास गेले,तर आईने लेकरांना नातेवाईकाच्या हवाली सोडून माहेर जवळ केले.दरम्यान काही दिवस नातेवाईकांनी मुलांना सांभाळले. परंतु आईबाप तिकडं मजा करत आहेत. आम्ही ही ब्याद का सांभाळायची?अशा भावनेने नातेवाईकांनी या तीन चिमुकल्यांना त्यांच्या आईचे गाव असणाऱ्या माजलगाव तालुक्यातील पुंगनी गावच्या पुलावर पुलावर सोडून दिले.ही बाब गावकऱ्यांच्या लक्षात येतात त्यांनी माजलगाव पोलिसांना याची माहिती दिली.दरम्यान पोलिसांनी मुलांना ताब्यात घेऊन बीडच्या बाल आश्रम ग्रहात त्यांना पोहोचण्याची व्यवस्था केली आहे. या कामी पोलीस कर्मचारी ऍटवाड, चव्हाण मॅडम,कापले मॅडम यांनी काम पाहिले.

## कपिलधार वाडी येथे त्री दिवशी किर्तन महोत्सवास प्रारंभ



**बीड । प्रतिनिधी**

इथून जवळच असलेल्या कपिलधार वाडी येथे महंत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे ,श्री महंत ह.भ.प.हरिहारनंद भारती महाराज श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान कोळवाडी यांच्या मार्गदर्शनाने व आशीर्वादाने दिनांक 19-5-2024 वैशाख शुद्ध ॥ 11। । आज पासून भव्यदिव्य त्री दिवशी कीर्तन महोत्सवाचे प्रारंभ करण्यात आलेले आहे.

या कीर्तन महोत्सवामध्ये ह.भ.प बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते व दि 20/5/24 रोजी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज काकडे यांचे हरिकीर्तन होणार आहे. दिनांक 21/5/2024 मंगळवारी सकाळी 10 ते12 वेळेमध्ये महंत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती नेकनुर यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे व श्री महंत ह.भ.प.हरिहारनंद भारती महाराज श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान कोळवाडी व विश्वनाथ आप्पा सलगार श्री. क्षेत्र कपिलधार यांच्या प्रमुख उपस्थिती नंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तरी या कीर्तन महोत्सवाचा व श्रवण भक्तीचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी कपिलधारवाडी व वाघेश्वरी मित्र मंडळ कपिलधारवाडी यांनी केले आहे. तर या नाम सप्ताहाला या महाराज मंडळींची अनमोल सात लाभत आहे. मृदंगाचार्य सर्वश्री ह.भ.प योगेश महाराज जोगदंड कोळवाडी, गायनाचार्य सर्वश्री ह.भ .प शिवाजी महाराज निवडे कामखेडा, शेषराव महाराज चव्हाण कोळवाडी,महादेव महाराज येडे मोरगाव, अर्जुन महाराज कांगडे ,अशोक महाराज येडे, सुशील महाराज शिंदे व काकडा नेतृत्व सर्वश्री ह.भ. प हरिदास महाराज खुळे, ह.भ.प वसंत महाराज शिंदे, हार्मोनियम वादक सर्वश्री ह.भ.प.शेषराव महाराज चव्हाण, महादेव रसाळ व समस्त गावकरी मंडळ कपिलधारवाडी व वाघेश्वरी तरुण मित्र मंडळ कपिलधारवाडी

## आलेक रेदासनी सीबीएसई परिक्षेत तालुक्यात अव्वल



माजलगाव / प्रतिनिधी: येथील सिंदफना पब्लिक स्कुलचा विद्यार्थी आलेक प्रमोद रेदासनी हा सीबीएसई 10 वीच्या परिक्षेत ९८% गुण मिळवून शाळेतून तसेच तालुक्यातून सर्वप्रथम आला आहे. त्याने हे यश कोणत्याही शिकवणी शिवाय स्वयं अध्ययनाच्या बळावर मिळविले आहे. सातत्याने अभ्यास, जिद्द, चिकाटीने मिळविलेल्या त्याच्या या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे. त्याच्या या यशात त्याच्या सर्व कुटुंबीयां समवेत शाळेचे प्राचार्य तसेच त्याच्या सर्व शिक्षकांचा वाटा आहे असे त्याने सांगितले.

# महसुल महसूल प्रशासनाच्या आशीर्वादाने वाळू माफिया माजलगाव शहरासह तालुक्यात पुरवठा करत आहेत वाळू.

## उपविभागीय अधिकारी इंगोले, तहसीलदार मनाळे चार होत आहे काना डोळा

## वाळुमाफीया बांधकाम करणाऱ्या कडुन करीत आहेत लुट











माजलगाव तालुक्यात कुठेही वाळूचे अधिकृत टेंडर नसताना सुद्धा मोठ्या प्रमाणात माजलगाव शहरासह परिसरात बांधकामे सुरू असून सदरील बांधकामाला वाळूमाफिया महसूल प्रशासनाच्या अर्थपूर्ण बाबीमुळे सर्वत्र वाळू मिळत आहे. यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असून वाळू माफिया वाळूचा ज्यादा भाव लावून लोकांची आर्थिक लूट करत असल्याचे दिसून येत आहे.

माजलगाव तालुक्याला गोदावरी नदीने विळखा घालून तिला भेटलेली सिंदफणा या उपनदीत मोठ्या प्रमाणात वाळू असून शासनाने गेल्या दोन वर्षापासून कसलीही वाळूचा लिलाव न केल्याने वाळू माफियांनी गोदावरी नदीचा सिंदफना नदी पोखरून मोठ्या प्रमाणात वाळूची तस्करी असल्याचा प्रकार सर्वत्र उघड असतानाही माजलगाव उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले व तहसीलदार वर्षा मनाळे यांचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याने वाळू माफियांनी मोठ्या प्रमाणात वाळू तस्करीचा नंगा नाच सुरू केला. यामुळे शासनाचा करोड रुपयाचा महसूल बुडाला तर एकीकडे वाळूबंदीच्या नावाखाली बांधकाम करणाऱ्या लोकांकडून दहा हजार रुपयाला एक ब्रास वाळू विक्री करून आर्थिक लूट करत असल्याचा प्रकार सुरू आहे. याला माजलगाव तहसील कार्यालयाच्या तहसीलदार जबाबदार असून याकडे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष होत आहे.

सदरील सदरील वाळू माफिया हे हिवरा, सादोळा, महातपुरी, पुरुषोत्तम पुरी, मंजरथ, आडोळा, गंगामसला, शुक्ल तीर्थ लिमगाव , मोगरा या गोदापात्रातील वाळूचा उपसा करून पात्राच्या बाहेर मोठ्या प्रमाणात वाळूचा साठा करून याच ठिकाणाहून वाळूच्या हजारो ब्रास ची तस्करी बिन बोभाट होत असून माजलगाव शहर ज्या ज्या ठिकाणी बांधकामे चालू आहेत त्या त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळूचे ढिगारे दिसत आहेत.

यापूर्वी असाच प्रकार होत असताना तात्कालीन तहसीलदार डॉक्टर प्रतिभा गोरे यांनी सदरील वाळू बाबत धडक मोहीम राबवत ज्या ज्या बांधकामावर वाळू आहे त्यांच्याकडून वाळू बाबत योग्य खुलासा न मिळाल्यास जप्त करण्यात आल्या होत्या. मात्र आज याकडे माजलगाव उपविभागीय महसूल अधिकारी व तहसीलदार यांचे दुर्लक्ष का होत आहे. असा सवाल सर्वसामान्य नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

पोलिसांची या वाळु वाहातुकीकडे दुर्लक्ष!

आज पर्यंत अनधिकृत वाळू वाहतुकीबाबत महसूल प्रशासनापेक्षा पोलीस प्रशासनाची करडी नजर असून यापूर्वी अनाधिकृत वाळू बाबत जेवढ्या जेवढ्या कारवाया झाल्या त्या पोलिसांनी पकडल्यामुळेच झाल्या आहेत मात्र सध्या माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन व माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या अधिकारी कर्मचारी यांना रात्रीची गस्त घालत असताना रात्रभर वाळूची तस्करी करणारे एकही वाहन कसे सापडले नाही याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

आत्ताच निवडणुकीच्या कामातुन थोडे मुक्त झालो आहोत. चोरटी वाळु होत असेल तर पथका मार्फत कारवाई केली जाईलवर्षा मनाळे तहसिलदार माजलगाव

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )